▌कथा▌

ऐश्वर्य पाटेकर

# अंगठा

ही गोष्ट आहे चाळीस एकरभर वावराच्या किंमतीच्या अंगठ्याची! माणसाच्या अंगठ्याची किंमत एवढी असू शकते काय? बरं असेलही एवढी किंमत! त्याच्यावर गोष्ट रचता येईल काय? पण मी रचली! कारण ती गोष्ट माझ्याभोवती घडलीय! म्हणजे वास्तवय; समस्या ही आहे, की एकतर अलीकडे माणूस वास्तवाला फार घाबरायला लागला. पण हे वास्तव ज्यांच्या आयुष्याला बिलगलंय त्यांचं काय? म्हणून त्यांच्या बाजूनं उभं राहून मला ही गोष्ट सांगावीच लागेल.

गावात कुणाला सुई लागली तर शेवंताईचं घर. कुणाला बैल लागला तरी शेवंताईचं घर. कुणाला दोन भाकरीपुरतं पीठ हवं तरी शेवंताईचं घर. शेवंताई कधीच कुणाला कशाला नाही म्हणली नाही. तिच्या दारावरून कुणीच रिकाम्या हाती जात नव्हतं. तिच्या कणग्या सदाच्याच भरलेल्या. शेवंताईचा नवरा आमदार काही झाला नव्हता. मात्र त्याला सारेच आमदार म्हणायचे. त्यामुळे साहजिकच शेवंताईला आमदारीन ही पदवी चालून आली. सारं गाव तिला आमदारीनच म्हणायचं. तिच्या मळ्यात रोजगारीवर साऱ्या गावाचं पोट. शेवंताईचा हात बिलकुलही आखडता कशात घेतला नाही. अशी ही साऱ्या गावची आमदारीन मरणादारी एकटी पडली होती. जिने साऱ्या गावाची गोधडी शिवली होती. आज तिच्याच गोधडीला धस गेला होता. अन् टाका मारत शिवण्यासाठी कुणीच उरलं नव्हतं. शेवंताईच्या तीनही लेकांनी

लेखक कथा कादंबरीकार आहेत.
ईमेल : oviaishpate@gmail.com

तिला वाळीत टाकलं होतं.

आयाबायांच्या हळहळीला एवढं कारण पुरेसं झालं होतं. बाया बाया जमून उस्करू लागल्या गोधडीचं आतलं पुरण...

‘जनावा चांद न्हायी त ऱ्हावा वांझ!’

‘न्हायी त काय!’

‘गंज तीन लेक; पन हाये का त्यायचा उपेग!’

‘असे लेक का चाटायचे धरुन!’

‘कशी मायवरची, माया आटून गेली भडव्यायची!’

‘नऊ महिने गर्भात ऱ्हायले त्याचे तरी व्याज फेडा म्हणावं!’

‘कलीचा वारा बायी दुसरा काय!’

‘हावं नं बायी खुशाल मायला मरणदारी सोडून देलं!’

‘लई जाड काळजाचेय बायी!’

‘आमदारनीची लेक कुसूम लई गुणाचीय बायी!’

‘पाठीपोटी यक तरी लेक असावी!’

‘तिला निरोप धाडला का?’

‘ती आईला मृत्यूच्या दाढेतून वढून काढीन!’

‘आता तिचीच वाट पहायची. पोरं मेले पक्के कसाई. माय मेली काय अन् जगली काय! यातच्याशी कायाबी त्यायला घेणंदेणं न्हायी!’

गावाचे डोळे कुसूमच्या वाटेकडे लागले...

एक-दोन दिवस म्हणता म्हणता गावानं आठ दिवस वाट पाहिली; पण एकुलत्या एका लेकीचाही पत्ता नव्हता. सारं गाव अंगणात बसून होतं. गावानं शेवंताईचं दवापाणीही सुरू केलं होतं. मात्र शेवंताईच्या तब्बेतीत कुठलाही सुधार नव्हता. गाव त्याच्यापरीनं सत्वाला जागत होतं. गोमताई पुंडलिकाला म्हणाली,

‘पुंडलिका, आसं साऱ्या गावानं काही बसून भागायचं न्हायी. पेरण्यावैरणीचा काळ हाये; म्या घेऊन जाते आमदारनीला माझ्या घरी; तिचे लई उपकारंय माझ्यावर!’

‘काकू तू म्हन्ते ते खरं हाये; पण तिचे लेक लई उलट्या काळजाचेय; उद्या कायी करता कायी झालं म्हण्जे! तुह्यावर नाहक टोपरा! तू कशाला म्हातारपणी कोर्टकचेऱ्यांची झंझट लावून घेती!’

म्हसोबाच्या मळ्यातल्या रंगनाथनंही पुंडलिकाच्या म्हणण्याला दुजोरा दिला!

‘अरे पण आसं मरू द्यायचं का? हे काय माला बरं दिसत न्हायी बाबा!’गोमताई काठी सावरीत म्हणाली.

‘जिणं गावाच्या मुखात चार दाणे भरले; आज ती अशी बेवारश्यासारखी पडूनय! गोमताईचं माला पटतं!’गोमताई उठली तरातरा वाड्याच्या पायऱ्या चढून शेवंताईच्या पलंगाजवळ येऊन उभी राहिली. पुंडलिकाची सून गोजर, शेवंताईला पेज भरवण्याचा प्रयत्न करत होती, पण शेवंताईनं ओठ पक्के धरून ठेवले होते.

‘असं काय करता आमदारीन! दोन चमचे पेज घ्या बरं; गोळ्या औषध पचवाया ताकद नको का अंगात?’

शेवंताई डोळ्यांनीच काही सांगू पहात होती. तिची जरा वाचाच गेली होती. मात्र गोमताईला ती भाषाही उमगली.

‘हये बघा माला माहितंय तुम्ही तुमच्या पोरायची वाट पाहताय!’

‘तुम्ही वनवाशी न्हायीये सारं गावंच तुमचे पोरंय! हये ध्यानात घ्या; नका येड्यावानी करू! गोजर आण गं त्यो वाटी चमच्या माह्याकडं, म्या भरवते माझ्या जाऊबायीला!’‘

आमदारनीच्या हट्टापुढे आता गावानंही गुडघे टेकले होते. आमदारनीचा आशय लोकांना थोडक्यात कळला, की माझे पोरं जरी येणार नसले तरी माझी लेक येईल. तिला तुम्ही नीट निरोप धाडला नसावा; नाही तर माझी हरणी आईसाठी

धावत पळत आली असती. लोकांनी असं वाटून गेलं की आपण म्हणतो तिला निरोप मिळाला असेल; पण तिला निरोपच गेला नसावा. नाहीतर खरंच पोरीचे पाय धरणीला टेकले नसते. म्हणून पुन्हा एकदा कुसूमला निरोप धाडण्यात आला. कुसूम खूप मुलखाला राहत होती असं काही नाही! पण काय झालं काही कळेना!

गाव पुन्हा कुसूमच्या वाटेकडं डोळे लावून बसलं. ह्या खेपेला मात्र कुसूम येणार होती. कारण तिला निरोप पोचलाच नव्हता. बाया बायाचं सुरू झालं वाड्याच्या अंगण्यात.

'पाह्य बाई आपुन बसलो रावश्याच्या भरुश्यावर, का त्यानं कुसूमला निरोप देला!''

'म्या तुला म्हन्ले व्हते नं सुमन! का कुसूमला आईविषयी कळलं त तिचा पाय ठैरनार न्हायी म्हणून!''

'ह्या रावश्याचं चांगलं बाडगं झोडायला पाह्यजे! गाडी भाड्याला देलेल्या पैशाची दारू प्याला!'

'त्या मेल्यानं आसं करावा का म्या म्हन्ते?'

'निखरट काळजाचा मेला!'

'माला वाटलं व्हतं कुसूम कायी तिच्या भावायसारखी निखरट काळजाची न्हायी!'

'तर तिची आईवर लई माया!'

एवढ्यात दारापाशी कचकन ब्रेक दाबत चारचाकी गाडी थांबली. आयाबाया आशेनं पाहू लागल्या. कुसूम गाडीतून उतरली. लोकांना खूप आनंद झाला. बायांनी तर तिला घेराव घातला.

'बरं झालं बायी तू आली!''

'आमदारीनबाईला कोण आनंद व्हईल तुला पाह्यल्यावर!'

'आईचे डोळे सारखे तुह्या वाटेवर लागले होते!'

'तुझ्या आईला आता तूच वाली. तुह्या भावांनी त देलं मोकलून!'

कुसूम गर्दीला सारत, वाट काढीत, आईच्या उशापाशी येऊन बसली. गोमताई, जिजाई, पुंडलिकाची आई अन् इतर बायांनी घर भरलं होतं. अंगणात बाया माणसं. पण आता सगळ्यांच्या चेहऱ्यावर समाधान होतं. कुसूम आपल्या आईला घेऊन जाईल.

शेवंताईचा श्वास आस्ते आस्ते चालू होता. गोमताई म्हणाली,

'बाई डोळे उघडा बघा तुम्ची हारणी आलीय!'

शेवंताईनं डोळे उघडले. लेकीला पाहताच तिच्या अंगात बळ आलं. गेल्या पंधरा दिवसांपासून शेवंताईची वाचा गेली होती. डोळे उघडे ठेवून नुस्ती भिटीभिटी पहात राहायची. तिच्या तोंडून 'कुसूऽऽम' शब्द निघाला. आयाबायानं तर इतका आनंद झाला. माया कशाला केली! कुसूमनं पर्स सावरली. तिची चैन खोलली. बायांना वाटलं लेकीनं काही खायलाच आणलं. तिनं त्यातून कागद बाहेर काढले. अन् आईस म्हणाली,

'बय, माझे भाऊ तुला ठाऊकय; तुझ्या माघारी सुतळीच्या तोडा मला इथला उचलू द्यायचे नाही. तुझे डोळे उघडे आहे तोपर्यंत अंगठा दे ह्या कागदावर!'

बाया काय समजायचं ते समजल्या. सगळ्यांच्या भावना उसवल्या गेल्या होत्या. टाका मारायलाही अवसर मिळाला नाही. कुसूमनं कागदावर आपल्या आईचा अंगठा घेतला. शेवंताईचा अंगठा साधासुदा नव्हता. तो चाळीस एकर वावराचा अंगठा होता. कुसूम कागदं उचलून आपल्या चारचाकी गाडीत जाऊन बसली. आयाबाया डोळे विस्फारून पहात होत्या. त्यांच्या मनात मोठा खड्डा पडला होता. तो आता कशानंच बुजणार नव्हता!

शेवंताईचं काय झालं? तिनं नुसताच अंगठा नाही दिला...

●